स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 10–05–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 6. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 7. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 9. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 10. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 11. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 12. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 13. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 14. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 2. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 81</u>ः– सी.सी. रोड फेज–2 अंतर्गत नागपूर शहरातील रस्त्याचे
{सा.प्र.वि.} सिमेंटीकरण करण्याकरिता 11 महिन्याच्या कंत्राटी तत्वावर अनुज्ञेय पारिश्रमिक मासिक वेतनावर पदवीधर साई इंजिनिअर पदवीकाधारक सुपरवाईजर आ. टी.आय. धारक सुपरवारईजर यांचे जाहिरात क्र. 292/पी.आर. दि. 27.09.2016 नुसार प्रत्यक्ष मुलाखती घेऊन नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले होते.

कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या एकूण 47 कर्मचाऱ्यांचा नियुक्तीचा कालावधी दि. 31.03.2018 ला संपला असल्यामुळे विभागाचे शिफारसीनुसार व आवश्यकतेनुसार त्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देणेबाबत तसेच दि. 03.04.2018 पासुन पुढील 3 महिन्याकरिता एकूण 47 कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्याचा व या 47 कर्मचाऱ्यांच्या 3 महिन्याच्या वेतनावर होणाऱ्या अंदाजे रु. 27 लाख खर्चास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 82:— {कर विभाग} नागपूर महानगरपालिका सिमेतील संपूर्ण इमारत व जमिन करीता उचित मालमत्ता कर निर्धारण होवून करदात्यांना उचित मालमत्ता कर मागणी देयके तामील होण्याहेतू मालमत्ता कर व कर आकारणी विभागाच्या अभिलेख्यात मिळकत निहाय योग्य data/माहितीच्या आधारेच मालमत्ता कर निर्धारण करणेबाबतचे काम कालबद्ध कालावधीत होणेच्या दृष्टीने PMC ची नियुक्ती करणेबाबत.

आर्थिक वर्ष २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकास मंजूरी प्रदान करतांना नागपूर महानगरपालिका सभागृहाने निर्णय घेतलेला आहे की, नागपूर महानगरपालिका सिमेतील संपूर्ण इमारत व जमिन करीता G.I.S. Based data खाजगी कंपनीद्वारा collect करून मालमत्ता कर निर्धारण करण्यात यावे. या अनुषंगाने स्थायी समीती महानगरपालिका नागपूर यांनी दि.१०/०९/२०१५ च्या बैठकीत ठराव क्र.१६२ अन्वये निर्णय घेवून नागपूर महानगरपालिका सिमेतील संपूर्ण मिळकतीचे Geo enabled data collect करणेचे काम मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड ला देण्यात आले. उक्त कामांतर्गत मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड द्वारा ६,००,००० मिळकतीकरीता दि.३०/०९/२०१७ पर्यंत data collect करावयाचा होता. परंतू मालमत्ता कर निर्धारणातील ५२७४८९ मिळकतीपैकी फक्त ३१०५९५ मिळकतीच्या ५०४८९३ युनीट व ७२९२७ नवीन मिळकतीच्या ९५६६० युनीट अशा एकूण ३८३५४१ मिळकतीच्या ६००८४७ युनीटचा data collect झालेला आहे. अजूनही शिल्लक २१६४५९ मिळकतीचा व त्याच्या युनीटचा data collect होणे गरजेचे असल्याने स्थायी समीती ठराव क्र.४९२ दि.०९/०२/२०१८ अन्वये सदर्हू कामे मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड व मे. अनंत टेक्नॉलॉजी यांचेकडून दि.३० जून २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. उक्त काम दि. ३० जुन २०१८ पर्यंत पूर्ण होणेहेतू तसेच महानगरपालिका सभागृह ठराव क्र.१५८ दि. ३०.१२.२०१७ च्या निर्णया नुसार ज्या करदात्याच्या इमारती मध्ये वर्षोनुवर्षापासुन काहिच बदल झालेला नाही व रहिवासी वापर असलेल्या इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ १५० चौ.मि. पेक्षा कमी आहे. अशा मिळकतीच्या मालमत्ता कर रकमेत दुपटी पेक्षा जास्त वाढ होऊ नये व इमारत वाणिज्य वापरता असल्यास तिपटी पेक्षा मालमत्ता करात वाढ होऊ नये या अनुषंगाने प्रत्येक मिळकती संबंधी चालू निर्धारण करतांना विचारात घेण्यात आलेला Data व M/S CYBERTECH SYSTEM & SOFTWARE LTD. द्वारा Collect करण्यात आलेल्या Data ची तुलना करण्याकरिता मालमत्ता कर व कर आकारणी विभागाच्या संगणीकृत Data Base मध्ये Readily Data उपलब्ध असणे गरजेचे असल्याने व त्याबाबत Monitoring करण्याकरिता व उक्त कामे कालबध्द कालावधीत पूर्ण करण्याकरिता PMC ची नेमणूक गरजेची आहे.

सध्यास्थितीत असलेल्या मालमत्ता कर निर्धारणाकरीता विचारात घेण्यात आलेल्या सदर्हू मालमत्तांचा data readily PTIS module द्वारे उपलब्ध होणेकरीता e-governance च्या PTIS module मधील Existing data base मधील data update करणे गरजेचे असल्याने उक्त कामे करून कालबद्ध कालावधीत करून घेणेकरीता PMC ची आवश्यकता आहे व सदर्हू कामाकरीता RFP प्रक्रिया राबवून PMC नेमणूक होणेबाबत प्रस्तूत करून व सदर्हू कामास अंदाजीत रू.२ कोटी खर्च अंदाजपत्रकीय पदशिर्ष क्र.A२९०००६२२६०४ अन्वये करण्याचे प्रस्तूत आहे.

कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी प्रदान करून RFP दस्ताऐवजास सुद्धा मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 83:— {जनसंपर्क विभाग} 1. नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या निविदा सूचना, जाहीर सूचना, दर्शनी जाहिराती व अन्य जाहिराती तयार करून वर्तमानपत्र, रेडीओ, टि.व्ही. इ. (इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडीया) प्रसार माध्यमांमार्फत प्रसारित करण्याकरीता म.न.पा. पॅनेलवर एजन्सी नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी ई. निविदा सूचनेद्वारे

निविदा मागविल्या असता पात्र निविदाधारका मधून प्रत्येक जाहिरातीवर सर्वाधिक 12.33 टक्के सुट देवू करणाऱ्या मे. व्हेन्चर्स ॲडव्हरटायझिंग प्रा. लि. यांना जाहिरात निर्मिती व वितरणाचे काम देण्याकरीता प्रथम एक वर्षाकरीता कार्यादेश देण्यास व दरम्यानचे काळात एजन्सीचे काम समाधानकारक आढळल्यास पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. त्याचप्रमाणे जाहिरातीची कामे खोळंबु नये म्हणून व निविदा प्रक्रिया सुरू असल्यामुळे विद्यमान एजन्सी मे. प्रॉफिट ॲडव्हरटायझर्स (इं.) प्रा. लि. नागपूर यांच्या कार्यादेशाची मुदत दि. 20.04.2018 रोजी संपुष्टात आली असल्याने विद्यमान एजन्सीला स्थायी समितीचे मान्यतेनंतर नवीन एजन्सीला कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 84</u>:— {कार्य. अभियंता(प्रकल्प)} पादचा—यांच्या सोयीकरीता नागपूर शहरात विविध ठिकाणी उभारावयाच्या पादचारी पुलाकरीता (FOB) सन 2010—11 च्या अर्थ संकल्पात नमुद व मा. स्थायी समिती ठराव क्र. 131, दिनांक 14.11.2011 नुसार एकुण 24 पादचारी पुलाचे बांधकाम प्रस्तावित होते. सध्यस्थितीत सदर पुलांचा बांधकामाबाबत अडचणीचा सांगोपांग विचार करता (टिप मध्ये नमुद तपशिलानुसार) प्रस्तावित पादचारी पुलांचे बांधकामाचा प्रकल्प रद्द करण्याच्या प्रश्न विचारात घेणे व सदर्हु प्रकल्पाकरीता नियुक्त उदयोजकासोबत केलेले करारनामे तथा या प्रकल्पाकरीता नियुक्त प्रकल्प सल्लागार यांचा करारनामा, करारनाम्यातील अटी, शर्तीच्या, प्रचलित नियम व कायदयाचे अधिन राहुन रद्द करण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासनास संमत्ती देण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 85</u>:— {हॉट मिक्स प्लॉन्ट} महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट करीता नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्ती व सूस्थीती व तसेच डांबरीकरणाच्या कामासाठी मे. हिंदूस्थान कोलाज लि.या राष्ट्रीयकृत कंपनीकडून अग्रिमद्वारे रु. 70,75,640.00 राशीचे थंडे डांबर (Hincol Emalsion) पद क्र. 795 (A82001490601) अंतर्गत खरेदी करण्याचे प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तदनंतर मे. हिंदूस्थान कोलाज लि .यांचेकडून टप्याटप्याने खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 86</u>:— {हॉट मिक्स प्लॉन्ट} महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट करीता नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्ती व सूस्थीती व तसेच डांबरीकरणाच्या कामासाठी मे. हिंदूस्थान पेट्रोलीयम कारपोरेशन लि. (H.P.C.L.)/मे. भारत पेट्रोलीयम कारपोरेशन लि. (B.P.C.L.) या राष्ट्रीयकृत कंपनीकडून अग्रिमद्वारे रु. 22913240.00 राशीचे डांबर पद क्र. 795 (A82001490601) अंतर्गत खरेदी करण्याचे प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तदनंतर मे. हिंदूस्थान पेट्रोलीयम कारपोरेशन लि./मे. भारत पेट्रोलीयम कारपोरेशन लि. यांचेकडून टप्याटप्याने खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 87</u>:— {जाहिरात विभाग} नागपूर शहरात फुटपाथवर विविध ठिकाणी उभारलेल्या बॅनर स्टॅन्डवर जाहिरातीचे अधिकार देण्यासंबधात प्राप्त झालेली मे. यश आउटडोअर्स यांची रु. १,१५,००,००२/— ची महत्तम दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 88</u>:— {बाजार विभाग} धरमपेठ झोन क्र. 2 अंतर्गत नेताजी मार्केट परिसरामध्ये श्री. अरूण दुधरामजी तिवाडे मागील 15 ते 20 वर्षा पासुन फुलांचा व्यवसाय करीत असुन, फुल ओटा क्र. D-4/23 आवंटन करण्याकरीता त्यांनी दि.

21/11/2017 रोजी निवेदन दिले आहे. मा. माजी सभापती स्थायी समिती श्री. संदीप जाधव यांनी दि. 22/11/2017 रोजी व मा. नगरसेवक, श्री. नरेंद्र बोरकर यांनी दि. 3/11/2017 रोजी उक्त ओटयाचे श्री. अरूण दुधरामजी तिवाडे यांना नियमानुसार आवंटन करण्याची शिफारस केलेली आहे.

सदर ओटयाचे क्षेत्रफळ 67.5 चौ. फुट (6.27 चौ. मी.) असुन सिध्द शिघ्र गणकानुसार त्याचे मुल्य रू. 3,29,714/— निश्चित करण्यात आले आहे. तसेच मासिक परवाना शुल्क रू. 2,263/— निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमाचे कलम 332 (क) अन्वये आयुक्तांना महानगरपालिका बाजारातील, कत्तलखान्यातील किंवा पशु—आवारातील कोणत्याही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यांचा भोगवटा किंवा वापर करण्याचा विशेषाधिकार, त्यास योग्य वाटेल अशा मुदतीसाठी आणि अशा शर्तीवर जाहीर लिलावाने देण्याचे किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगीरीत्या विक्री करून विनियोग करण्याची तरतुद आहे.

वरील कलमाला अनुसरून नेताजी मार्केट परिसरातील फुल ओटा क्र. D-4/23 श्री. अरूण दुधरामजी तिवाडे यांना 11 महिन्याच्या अस्थायी परवान्यावर आवंटीत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 89</u>:— {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 2 (ड) अंतर्गत कामगार नगर म.न.पा. शाळे करिता सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्याकरिता प्राप्त तीन निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 40,03,530/— पेक्षा 5.60 टक्के कमी दराची रू. 37,79,333/—(रूपये सदतीस लक्ष एकोणऐंशी हजार तीनशे तेहतीस) ची निविदा स्विकृत करण्याचा तसेच हे काम पद क्र. 752 (A45202072702) वर्ष 2017—18 अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा आणी वर्ष 2018—19 च्या बांधील तरतूदीत समावेश करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पदशिर्ष क्र. A42001374615 (संरक्षण भिंत) या पदामधुन सन 2018—19 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास मनपा सभागृहाची अंतिम मंजुरी प्राप्त झाल्यावर उपरोक्त प्रस्ताव स्थायी समिती समोर प्रावधान नोंदवुन प्रस्तावित विषय परत सादर करावा या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 90</u>:— {वाहतूक विभाग} कविवर्य सुरेश भट सभागृहामधील वाहनतळावर ''पार्कींग'' करीताचे खालीलप्रमाणे दर निश्चित करण्याचा प्रश्न विचारात घेवून,

| अनु. क्र | वाहन | दर |
|---|---|---|
| 1 | सायकल | रू. 5/— प्रति कार्यक्रम |
| 2 | स्कुटर/मोटार सायकल | रू. 10/— प्रति कार्यक्रम |
| 3 | चार चाकी वाहन/कार | रू. 20/— प्रति कार्यक्रम |

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 91</u>:— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. २७ ब अंतर्गत गुरूदेव नगर तुकडोजी सभागृहाच्या मागे नाल्यावर बॉक्स सेल टाईप नाल्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी मे. 786 कन्ट्रक्शन ॲन्ड डेकोरेशन यांची मुळ प्राक्कलनीय दरापेक्षा १२.०४% ने कमी व नविन CSR पेक्षा ४.९५% ने कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २६,०१,०३५/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन सन 2018—19 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास मनपा सभागृहाची अंतिम मंजुरी प्राप्त झाल्यावर उपरोक्त

प्रस्ताव स्थायी समिती समोर प्रावधान नोंदवुन प्रस्तावित विषय परत सादर करावा या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 92:—** **{शहर अभियंता}** नागपूर शहरातील सिमेंट रस्ता प्रकल्प टप्पा—१ व २ अंतर्गत म.न.पा. व्दारे सुरू असलेल्या कामांसंदर्भात, कामांचे गुणवत्ते बाबत शहरातील सामाजिक संस्थानी लेखी निवेदन देवून त्यांनी त्रयस्थ संस्थे मार्फत गुणवत्ता तपासण्याची मागणी केलेली आहे.

केंद्रीय सडक अनुसंधान संस्थान (सी.एस.आय.आर.—Central Road Research Institute ) या संस्थेस थर्ड पार्टी ऑडीट करण्यासंबंधात विचारणा केली मात्र त्यांनी त्यास असमर्थता दर्शविली मात्र त्यांनी विभागास दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेव्दारा सुरू असलेला सिमेंट कॉक्रिट रस्ते प्रकल्प टप्पा—२ अंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा तसेच प्रयोगशाळेतून प्राप्त चाचणी अहवालाचा आढावा घेणे, प्रत्यक्ष कामाचे वेळी येत असलेल्या तांत्रिक बाबींकरिता तज्ञाचा सल्ला व मार्गदर्शन, कामाची गुणवत्ता वाढविण्याकरिता मौक्यावरील स्थिती नुसार वापरण्यात येणारे बांधकाम साहित्या बाबत मार्गदर्शन, कामाच्या संपूर्ण गुणवत्तेचे असेसमेंट त्याचप्रमाणे जर गुणवत्तेत काही त्रुटया आढळल्यास, त्यावरील उपाययोजना इत्यादी बाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्याकरिता, म.न.पा. व्दारा सुरू असलेल्या सिमेंट रस्ता प्रकल्प टप्पा— २ करिता (सी.एस.आय.आर.—Central Road Research Institute) यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार देय फी रू. ५६,६४,०००/— तसेच आवश्यकते नुसारफिल्ड टेस्टींग चार्जेस पोटी येणाऱ्या अतिरीक्त रू. ४४,८४,०००/—च्या खर्चास मंजुरी प्रदान करून केंद्रीय सडक अनुसंधान संस्थान (सी.एस.आय.आर.) ची नेमणूक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 93:—** **{लोककर्म झोन 06}** प्रभाग क्र. १८ अबक श्री बांगरे ते नवप्रतिभा हायस्कुल पर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त 5 निविदांपैकी मे. ७८६ कन्स्ट्रक्शन अॅण्ड डेकोरेशन यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा १५.१२ प्रतिशतने कमी व नविन C.S.R. दरापेक्षा ०.४० प्रतिशतने कमी दरांची रू.३७,७४,७६०/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सन 2018—19 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास मनपा सभागृहाची अंतिम मंजुरी प्राप्त झाल्यावर उपरोक्त प्रस्ताव स्थायी समिती समोर प्रावधान नोंदवुन प्रस्तावित विषय परत सादर करावा या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 94:—** **{कारखाना विभाग}** मा.ना.श्री. नितीनजी गडकरी, लोकसभा सदस्य, नागपूर, आणी मा. खासदार श्री. अजयजी संचेती व मा. खासदार डॉ. श्री. विकास महात्मे, राज्यसभा सदस्य, नागपूर. यांच्या खासदार निधीतुन स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत प्रत्येकी 02 रुग्णवाहिका, 02 शववाहिका व 02 शवपेटी खरेदी करण्याच्या अनुषंगाने, असे एकुण 06 रुग्णवाहिका, 06 शववाहिका व 06 शवपेटी, खरेदी करण्याकरीता, कारखाना विभागातर्फे सदर वाहने खरेदी करण्यास्तव अदांजपत्रक व इतर आवश्यक कागदपत्रे, जिल्हा नियोजन कार्यालयास सादर करण्यात आले.

त्याअनुषंगाने जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचे खालील प्रमाणे प्रशासकीय मंजूरीचे आदेश प्राप्त झाले आहे.

1) पत्र क्र जिनिस/कार्या—37/खास्थाविका/का—3/407/2018 दि. 03/03/2018 अन्वये, मा. खासदार श्री. नितिनजी गडकरी, यांचे स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाअतर्गत त्यांचे खासदार निधितुन म.न.पा करीता, नमुद वाहने खरेदीस्तव रु. 69,91,414/- राशीचा निधी मजुंर झाल्याचे कळविले आहे.

2) पत्र क्र जिनिस/कार्या–37/खास्थाविका/का–3/370/2017–2018 दि. 27/02/2018 अन्वये, राज्यसभा सदस्य, मा. श्री. अजयजी संचेती, यांचे स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाअतंर्गत त्यांचे खासदार निधितुन म.न.पा करीता, नमुद वाहने खरेदीस्तव रु. 69,91,414/- राशीचा निधी मजुंर झाल्याचे कळविले आहे.

3) पत्र क्र जिनिस/कार्या–37/खास्थाविका/का–3/428/2018 दि. 05/03/2018 अन्वये, राज्यसभा सदस्य, मा. श्री. विकासजी महात्मे, यांचे स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाअतंर्गत त्यांचे खासदार निधितुन म.न.पा करीता, नमुद वाहने खरेदीस्तव रु. 69,91,414/- राशीचा निधी मजुंर झाल्याचे कळविले आहे.

**06 रुग्णवाहिका, 06 शववाहिका व 06 शवपेटी, हि शहरातील विविध 06 रुग्णालयांना सलंग्न राहणार आहे.**

| अ.क्र. | विवरण | प्रतिनग दर प्राकलणीय राशी | प्राकलणीय दर 02 नग करीता | 06 नग करीता दर (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1) | रुग्णवाहिका | 18,85,007/- | 37,70,014/- | 1,13,10,042/- |
| 2) | शववाहिका | 13,47,500/- | 26,95,000/- | 80,85,000/- |
| 3) | शवपेटी | 2,63,200/- | 05,26,400/- | 15,79,200/- |
| | एकुण | | 69,91,414/- | 2,09,74,242/- |

मा.ना.श्री. नितीनजी गडकरी, लोकसभा सदस्य, नागपूर, आणी मा. खासदार श्री. अजयजी संचेती व मा. खासदार डॉ. श्री. विकास महात्मे, राज्यसभा सदस्य, नागपूर. यांच्या खासदार निधीतुन स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत प्रत्येकी 02 रुग्णवाहिका, 02 शववाहिका व 02 शवपेटी खरेदी करण्याच्या एकुण मंजुर निधि रु. 2,09,74,242/- राशीपैकी प्रत्येक मान्यवराच्या स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमा अतंर्गत सध्यास्थित रु. 35,00,000/- राशी प्रमाणे एकुण 1,05,00,000/- मनपास प्राप्त झालेले आहे. [1) – धनादेश क्र. 113509 दि. 03/03/2018, रु. 35,00,000/- 2) – धनादेश क्र. 364052 दि. 27/02/2018, रु. 35,00,000/- 3) – धनादेश क्र. 107008 दि. 05/03/2018, रु. 35,00,000/-]

उपरोक्त सादर केलेल्या विवरण तसेच प्राकलणीय राशी रुपये 2,09,74,242/- अतंर्गत प्रत्येकी 02 रुग्णवाहिका, 02 शववाहिका व 02 शवपेटी खरेदी करण्याच्या अनुषंगाने, एकुण 06 रुग्णवाहिका, 06 शववाहिका व 06 शवपेटी, खरेदी करण्याकरीता ई–निविदा मागविण्यात येतील व प्राप्त ई–निविदा प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच असेही सादर करण्यात येते की सदर प्रस्तावास मंजुरी नंतर रितसर कार्यवाही करण्यात येईल व जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. यांच्यातर्फे उर्वरीत राशी मनपास प्राप्त झाल्यानंतरच वाहन खरेदीस्तव कार्यादेश देण्यात येईल.

करीता, मा.ना.श्री. नितीनजी गडकरी, लोकसभा सदस्य, नागपूर, आणी मा. खासदार श्री. अजयजी संचेती व मा. खासदार डॉ. श्री. विकासजी महात्मे, राज्यसभा सदस्य, नागपूर. यांच्या खासदार निधीतुन स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत प्रत्येकी 02 रुग्णवाहिका, 02 शववाहिका व 02 शवपेटी खरेदी करण्याच्या अनुषंगाने, एकुण 06 नग रुग्णवाहिका, 06 नग शववाहिका व 06 नग शवपेटी, खरेदी करण्याकरीता ई–निविदा मागविण्याच्या प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 95ः–</u>** नागपूर शहरातील सिमेंट कॉंक्रीट रस्ता टप्पा – २, पॅकेज {**प्रकल्प विभाग**} क्र. १० अंतर्गतचे कामाकरीता पद क्र. A42001470514 अंतर्गत रू. १२,६२,३९,९९१/– ला प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. या पॅकेज अंतर्गत रस्ता क्र. ४३ नरेंद्र नगर ब्रिज जवळ रिंग रोड ते विवेकानंद नगर चौक ते देवनगर टी पॉईंट या रस्ताचे मध्यापासून सुमारे 0.75 मी. वर 1000mm व्यासाची व अन्य जलवाहीन्या असल्याने या रस्त्यास सिमेंट कॉंक्रीट ऐवजी डांबरीकरण करणे व या कारणास्तव या प्रकल्पाअंतर्गत

होत असलेल्या बचतीमुळे याच परीसरातील राहाटे कॉलोनी चौक ते कॉंग्रेसनगर टि पॉईंट पर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीट रस्ता मध्ये समावेश करण्याचा प्रश्न विचारात घेणे तसेच संपूर्ण पॅकेजकरीता राशी रू. १२,५९,९५,४०४/— चा अंदाजित सुधारीत प्राकलनाला तथा या पॅकेजकरीताचे कंत्राटदार मे. जे.पी.ई.एस.आर.के.इन्फ्रा (जे.वी.) यांचा पूर्व करारनामा व दरानुसार (१० टक्के कमी) प्राथमिक अंदाजानुसार रू. १,०५,७५,९६२/— चे अतिरीक्त राशीचे कार्यादेश देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 96:—** गांधीसागर तलावात 3 वर्ष कालावधीकरिता मत्स्यव्यवसाय **{उद्यान विभाग}** करण्याचा कंत्राट देण्याकरिता निविदा बोलविल्या असता प्राप्त निविदांपैकी उच्चतम किंमतीचे निविदाधारक मे. वैशाली खापरे यांना हा कंत्राट राशी रु. 33,00,000/— ला देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 97:—** भांडेवाडी येथे सुरु असलेल्या प्रक्रिया केन्द्रामधे 200 MT कचऱ्यावर **{पिंच प्रकल्प कक्ष}** प्रक्रिया करण्यात येते. यामुळे नागपूर शहरातून दररोज निर्माण होणाऱ्या एकूण अंदाजे 1100 MT कचऱ्यापैकी 900 MT प्रति दिनाप्रमाणे कचरा साठवून ठेवला आहे. हा कचरा अंदाजे १०.०० लक्ष MT असून या संपूर्ण कचऱ्याचे Bio-mining करुन विल्हेवाट लावून ती जागा रिकामी करण्याचे प्रस्तावित होते. याबाबत SBM अंतर्गत MOUD, GOI ने सुध्दा निर्देश दिलेले आहे व प्रारुप Request for Proposal (RFP) सुध्दा दिलेला होता. त्याआधारावरच मनपाने निविदा प्रक्रिया Mahaonline द्वारे व वृत्तपत्राद्वारे EOI प्रकाशित केला होता. यामध्ये ४ निविदेकारांनी इच्छा दर्शविली होती. या निविदाकारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

1. M/s SMS Ltd. Nagpur
2. M/s Mailhem IKOS Env. Ltd., Pune
3. M/s Satyam Chemicals Nagpur
4. M/s Zigma Global Environ Solutions Pvt. Ltd.

यापैकी ३ निविदेकारांना shortlist करण्यात आले व त्यांची निविदा घेण्याकरीता निवड केली व निविदा भरण्याकरीता पात्र ठरविण्यात आले. RFP Online द्वारे घेण्याचे कळविण्यात आले. यामध्ये फक्त M/s Zigma Global Environ Solutions Pvt. Ltd. यांनीच RFP घेतले. Single निविदा असल्यामुळे फेर निविदा मागविण्यात आली. त्यामध्ये सुध्दा एकच निविदा आल्याने 3rd Call काढण्यात आले. यामध्ये M/s. Zigma Global Environ Solutions Pvt. Ltd. यांनीच निविदा घेतल्याने त्यांची एकमेव निविदा उघडण्यात आली.

एकच निविदेकाराच्या निविदेत त्यांनी रु. 1230/ MT चा दर दिल्याने व ती जास्त असल्याचे विभागाचे मत असल्यामुळे या दराचे विश्लेषण करण्यासाठी MOUD ला पत्र देण्याचे प्रस्तावित करण्यात आले व त्यांनतर दि. १५.१२.२०१७ ला M/s Zigma Global Environ Solutions Pvt. Ltd. यांना दर कमी करण्याकरीता पत्र देण्यात आले त्यावर दि. १८.१२.२०१७ च्या M/s Zigma Global Environ Solutions Pvt. Ltd. यांच्या पत्रान्वये त्यांनी दर Rs. 1040/MT वर काम करण्यास संमती दर्शविली आहे. या रु. 1040/MT चे दर बरोबर आहे किंवा कसे याकरीता Joint Secretary (SBM) MOUD, GOI यांना दि. २२.१२.२०१७ च्या पत्रान्वये अभिमत व मार्गदर्शन करावे अशी विनंती करण्यात आली. त्या अनुषंगाने त्यांनी दि. २९ डिसेंबर २०१७ च्या Mail द्वारे पुढीलप्रमाणे कळविले आहे.

"I have been directed to inform you that since you have called the bid multiple time and still received a single bid, thus you may take your own call to go with the single bid received. Ministry will support your decision and will provide financial grant as approved by the State Mission Directorate (SBM) and in line with the guidelines of Swachh Bharat Mission.
Dumpsite Remediation is an important call, since land is limited, thus Ministry support the cause."

तद्नंतर याबाबत अधिक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांच्या दि. १०.०१.२०१८ च्या अभिप्रायानुसार हे दर देखील जास्त असून कमी करण्याचा प्रयत्न करावा असे सूचविले. त्या अनुषंगाने मा. आयुक्तांनी दि. ११.०१.२०१८ च्या आदेशान्वये मुख्य अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अति. उपायुक्त—२ यांची त्रीसदस्यीय समिती स्थापन केली व दर विश्लेषण करण्याचे निर्देश दिले.

या समितीने वेळोवेळी बैठका घेवून दराबद्दल इतर शहरांचा काय कल आहे याबाबत M/s Zigma Global Environ Solutions Pvt. Ltd. यांना विचारणा केली असता खालील नोंद घेतली.

| Sr. No. | Name of ULB | Bio-Mining quantity | Rate accepted by ULB | Agency / Agreement Date |
|---|---|---|---|---|
| 1. | Vijaywada (A.P.) | 2.50 Lacs MT | Rs. 842/MT | M/s Zigma Global Environ Solution Pvt. Ltd. Erode LOA dated 29.09.2017 |
| 2. | Vadodara (Gujrat) | 3.00 Lacs MT | Rs. 887/MT | M/s Zigma Global Environ Solution Pvt. Ltd. Erode Agreement dated 6.10.2017 |
| 3. | Tirupati | 2.70 Lacs MT | Rs. 953/MT | L1 bidder rate (As per telephonic talk) |
| 4. | Gaziabad | 5.00 Lacs. MT | Rs. 1240/MT | L1 bidder rate (As per telephonic talk) |

यानंतर कमिटीने M/s Zigma Global Environ Solutions Pvt. Ltd. यांचे दर financial Consultant कडून तपासून घ्यावे असे प्रस्तावित करुन मा. आयुक्तांची दि. २८.०२.२०१८ ला मान्यता घेतली. त्याअनुषंगाने M/s Mitcon Consultancy & Engineering Services Ltd. यांना दि. ०१.०३.२०१८ च्या व दि. ७.३.२०१८ च्या पत्रान्वये या निविदेची आर्थिक तपासणी करण्याकरीता कळविण्यात आले. त्यांनी त्यांचा अहवाल दि. ३१.०३.२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेला आहे. ते पत्र नस्ती मधे टाचन आहे. पत्रात नमुद केल्यानुसार निविदेकाराने प्रस्तावित केलेली रु. 250/MT हा Cement Plant Chandrapur येथे RDF नेण्याचा दर लक्षात घेता मनपाने ते RDF प्रस्तावित WtE Plant ला देण्याकरीता साठवावे असे सूचविले आहे. याबाबत देखील अंतिम निर्णय आवश्यक आहे.

सदरहू अहवाल पत्रे व माहिती त्रीसदस्यीय समिती पुढे ठेवण्यात आली व समितीने विभागाशी व तांत्रिक सल्लागार यांचेशी विचार विमर्श करुन दि. १६.०४.२०१८ च्या बैठकित M/s Zigma Global Environ Solutions Pvt. Ltd. यांच्या दि. १६.०४.२०१८ च्या पत्रान्वये दिलेल्या final offer रु. 1015/MT च्या दराला त्रीसदस्यीय समितीने शिफारस केलेली आहे तसेच संपूर्ण केलेली प्रक्रिया मा. आयुक्त यांच्या समोर सादर करण्यात आली. मा. आयुक्तांनी Bio-mining च्या या प्रकल्पाकरीता केलेल्या संपूर्ण प्रक्रियेस व दर निश्चितीकरण करण्याच्या अंतिम निर्णयार्थ मा. स्थायी समिती पुढे सादर करण्याकरीता निर्देशित केले तसेच MOUD ला देखील दराबाबत माहिती देण्यास निर्देश दिले. त्यानुसार दि. २३.०४.२०१८ ला MOUD ला Mail द्वारे कळविण्यात आले आहे.

वरील संपूर्ण प्रक्रियेस मंजूरी देण्याचा व दर निश्चित करण्याचा प्रश्न विचारात घेवून तसेच जर भविष्यात मनपा RDF साठविण्याची गरज भासल्यास त्याप्रमाणे रु. २५०/MT ने दर कमी करण्याचा पर्याय उपलब्ध ठेवण्याबाबत देखील निर्णयार्थ सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, माझ्या प्रभागात 3 सिमेंट रोडचे काम बंद आहे त्यामुळे लोकांच्या गाडया घराच्या आतमध्ये फसल्या आहे. त्या गाडया काढण्यासाठी लेव्हल करण्यात यावे, शहरात फेज 1 व फेज 2 सिमेंट रोडचे काम किती ठिकाणी सुरु आहे व किती ठिकाणी बंद आहे ते काम टाईम पिरेडमध्ये पुर्ण करण्यात यावे, त्याचबरोबर त्या रस्त्यांची लांबी रुंदी निट तपासली पाहिजे, ठेकेदार वेळेवर काम करीत नसेल तर त्यांच्याकडुन पेनॉल्टी वसुल केली पाहिजे या सर्व बाबींकडे विभागाने लक्ष दयावे.

कार्यकारी अभियंता (श्री.भुतकर) :— मा.सभापती महोदय, मा.सदास्य श्री.मनोज सांगोळे यांनी सांगितल्याप्रमाणे त्या रस्त्यांचे एस्ट्रा ॲटमसाठी काम थांबले होते परंतु ते आता सुरु झालेले आहे व तो रस्ता टाईम पिरेडमध्ये आहे.

सभापती :— मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे यांनी जो विषय ठेवला आहे त्या अनुषंगाने ठेकेदारांशी बोलुन ते काम त्वरीत पुर्ण करावे. सिमेंट रोडच्या कामाच्या संदर्भात टाईम पिरेडमध्ये काम पर्ण कसे होतील या अनुषंगाने अति.आयुक्त श्री.कुंभारे, मुख्य अभियंता, तालेवार, तांत्रिक

सल्लागार श्री.बनगिनवार यांनी एकत्रित बसुन कामाच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करावी. पुढील स्थायी समितीच्या सभेत जलप्रदाय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येईल, या संदर्भात अति.आयुक्त श्री.कुंभारे यांनी फॉरमॅट तयार करावे, त्यामध्ये मागच्या वर्षीच्या वसुलीची माहिती ऐरिया वाईज घेण्यात येईल, त्याचबरोबर ज्या लोकांना ॲव्हरेजने बिल पाठविण्यात येत आहे त्यांना ॲव्हरेजने बिल न पाठविता रिडींगने बिल कसे पाठविता येईल या अनुषंगाने सुध्दा माहिती घेण्यात येईल, विभागाने त्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी. मालमत्ता कराच्या संदर्भात ज्या प्रॉपर्टी धारकावर बकाया वसुली मोठया प्रमाणात शिल्लक आहे त्यांच्या प्रॉपर्टीचे लिलाव करण्याकरीता विभागाने प्लॅनिंग तयार करावे, सायबर टेकच्या कामाच्या संदर्भात रोज आढावा घेण्यात यावा, कर निरीक्षक यांच्याशी वेळोवेळी चर्चा करुन त्यांना जास्तीत जास्त टॅक्स वसुल करण्याबाबत सूचित करण्यात यावे.

**ठराव क्रमांक 98** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर